निशाणी क्र.४६ /क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.७ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - सुभाष लक्ष्मण पाटील,
वय - ५२ वर्षे,
हुद्दा - सहाय्यक फौजदार,
नेमणूक - पोलिस मुख्यालय, अलिबाग.

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी खालापूर पोलिस स्टेशन येथे पोलिस नाईक या पदावर सन २०१३ ते २०१८ या कालावधी मध्ये कार्यरत होतो. त्यावेळी माझा बक्कल नंबर २१०१ असा होता. दि. १८/०५/२०१६ रोजी फिर्यादी आवेज मुस्ताफ सुरती यांनी दिलेली फिर्याद ठाणे अंमलदार यांनी गु.र.क्र. ११८/२०१६ नुसार नोंद करुन घेतली. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान मी दि. १८/०५/२०१६ रोजी आरोपी क्र. १ ते ४ यांना सी.आर.पी.सी. कलम ४१-अ नुसार नोटीसा दिल्या. आता मला दाखवन्यात आलेल्या नोटीसा त्याच आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नोटीसना अनुक्रमे **निशाणी ४७** ते **५०** देण्यात येत आहे. त्यानंतर मी दि. १९/०५/२०१६ रोजी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ हे मौजे धामणी गावच्या हद्दीत सजा कुंभीवली येथील सर्वे क्र. ५०/४ येथे होते. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळ फिर्यादी यांनी दाखवले. सदर ठिकाणी ट्रकचे टायर मार्कचे निशाण दिसत होते तसेच आरोपी यांनी ट्रक क्र. एम.एच. ४६ ए.सी. २११३ हीला त्यांची मोटरसायकल क्र. एम.एच. ०६ / ४६४७ व ४७०९ या रस्त्यात आडव्या केल्याचे फिर्यादीने सांगितले. घटनास्थळावर काही एक चिज वस्तू मिळून आली. त्यानंतर मी घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी ५१** देण्यात आली. त्यानंतर मी दि. २४/०५/२०१६ रोजी आरोपी रामचंद्र चोगले याने गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल

पोलिस ठाण्यात हजर केल्याने ती दोन पंचांसमक्ष जप्त केली. सदर मोटरसायकलचा नंबर एम.एच. ४६ वाय ४७०९ असा होता. आता मला दाखवण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनाम्यास **निशाणी ५२** देण्यात आली. त्यानंतर मी जप्त मुद्देमाल पावतीने पोलिस स्टेशन मध्ये जमा केला. आता मला दाखवण्यात आलेली मुद्देमाल पावतीची कार्बन प्रत तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुद्देमाल पावतीस **निशाणी ५३** देण्यात आली. तपासादरम्यान मी दि. २३/०५/२०१६ रोजी फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला. सदर पुरवणी जबाबामध्ये फिर्यादीने असे सांगितले की, घटनास्थळावर उभ्या असणा-या मोटरसायकल पैकी एक मोटरसायकल त्यांचे कॉन्ट्रॅक्टर धर्मेंद्र पिंगळे यांची होती व दुसरी मोटरसायकल चेतन चोगले याची होती. त्यानुसार मी पुरवणी जबाब नोंदवला. आता मला दाखवण्यात आलेला पुरवणी जबाब तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पुरवणी जबाबास **निशाणी ५४** देण्यात आली. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर मी गट क्र. ५३/३/अ/२ चा ७/१२ उतारा व गट क्र. ५०/४, ५०/३, ५०/१, ४९अ/२, ६/१/अ, यांचे ७/१२ उतारे दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. तपासादरम्यान मी दि. २४/०५/२०१६ रोजी आरोपींना अटक केली होती. आता मला दाखवण्यात आलेले आरोपींचे अटक पंचनामे तेच आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी जप्त मोटरसायकलचे कागदपत्र दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. मी केलेल्या एकंदरीत तपासामध्ये आरोपींनी त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल फिर्यादी यांच्या जागेत येवुन भरावासाठी माती आणलेल्या ट्रकच्या आडवी लावून फिर्यादी यांना तसेच साक्षीदार चंद्रकांत देवकर यांना शिवीगाळ व दमदाटी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे मी त्यांच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र पाठविले. आरोपींना पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. २ व ४ आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. टी. यु. परबळकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे हे दाखवणारे कागदपत्र मी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर चालू असलेल्या कामाची वर्क ऑर्डर मी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ट्रक चालक त्या दिवशी कामावर होता हे दाखवणारे हजेरी पत्रक या कामाल दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा तसेच जप्ती पंचनामा पंचांसमक्ष केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतीही मुद्देमाल पावती बनवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त करण्यात आलेली गाडी कोणाच्या मालकीची आहे हे दाखवणारे कागदपत्र मी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या माहितीच्या आधारे चुकीचे दोषारोप पत्र पाठवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना कोणत्याही प्रकारच्या नोटीसा दिलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.05 18:50:19 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - ०५/०३/२०२६